निर्भया पथक प्रबोधन कार्यक्रम



सातार्‍यातील पेरेंट्स इंग्लिश स्कूलमध्ये सायबर सुरक्षितेबाबत कार्यशाळा झाली.

# ‘पेरेंट्स स्कूल’मध्ये सायबर सुरक्षिततेविषयी कार्यशाळा

लोकमत न्यूज़ नेटवर्क

सातारा : पेरेंट्स असोसिएशन इंग्लिश स्कूल, सातारा येथे ‘सायबर सेक्युरिटी आणि सेफ्टी’ याबाबत जागृतीसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यशाळेत पासवर्ड कसा असावा, फेक वेबसाईट कशी ओळखावी, गेम खेळताना किंवा इन्स्टॉल करताना काय करावे व काय करू नये याची चर्चा झाली.

ऑनलाइन फसवणूक, मोबाइल हॅकिंग, डेटा चोरी, सायबर बुलिंग या मुद्द्यावर सखोल मार्गदर्शन केले.

आदित्य मेनकुदळे व अथर्व अहिरे आणि हर्ष कल्याणकर, गणेश फडतरे व कोऑर्डिनेटर विकास चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका नेहा टाकेकर, उपमुख्याध्यापिका अनिता शिंदे, ज्योती पाटील, अर्चना आडमुठे यांचे सहकार्य लाभले. (वा.प्र.)